Bi-Annual Refereed Journal

ISSN : 2456-9658

# Global Researcher View

An International Peer Reviewed Journal of Social Sciences and Humanities

RNI No. RAJBIL/2016/[illegible]

Special issue on the occasion of 150th Birth Anniversary of Mahatma Gandhi

National Seminar on

## महात्मा गांधी

### विचार, तत्वज्ञान आणि प्रेरणा



Editor
**Chandra Shekhar Kachhawa**

globalreasercherview2015@gmail.com

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य संकल्पना | प्रा.डॉ. मोराळे एस.आर., प्रा.पोटभरे एस.डी. | 72 |
| 25 | म. गांधी यांची ग्राम 'स्वराज्य संकल्पना' काळाची गरज | डॉ. गजानन रा. मुधोळकर | 75 |
| 26 | महात्मा गांधीजीची ग्रामस्वराज्याची संकल्पना : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ. मुंडे रामकिशन हरिदास | 78 |
| 27 | महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार - एक दृष्टिकोन | सौ. पाऊलबुद्धे अनुराधा रामभाऊ, प्रा.डॉ. अशोक कारडे | 81 |
| 28 | महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास | प्रा. संध्या पेंडकर देशपांडे | 84 |
| 29 | महात्मा गांधीच्या स्वप्नातील भारत | प्रा.पोपळघट आर.एस. | 88 |
| 30 | ग्रामस्वराज्याविषयी महात्मा गांधीजीचे तत्त्वज्ञान व कार्य | प्रा.ईश्वर ल. राठोड | 91 |
| 31 | महात्मा गांधीजी एक असामान्य व्यक्तिमत्त्व | श्री. राऊत रामेश्वर बाबासाहेब | 95 |
| 32 | महात्मा गांधी आणि महिला सक्षमीकरण | प्रा.साळुंके इंदू चंद्रकांत | 97 |
| 33 | पर्यावरण संरक्षणासाठी गांधी विचार काळाची गरज : एक चिंतन | प्रा.डॉ. संजय सांभाळकर | 100 |
| 34 | महात्मा गांधीजींचे ग्रामोद्योगा संबंधी विचार एक अभ्यास | प्रा.सोनवणे गिताबाई शिवराम | 102 |
| 35 | महात्मा गांधीजींचे धार्मिक एकतेचे सैद्धांतिक विचार आणि आजचे धर्माचे राजकारण | प्रा.सौ. सुपेकर वैशाली प्रशांत | 105 |
| 36 | महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास : एक दृष्टिक्षेप | डॉ. उमाकांत सुभाष गायकवाड | 108 |
| 37 | महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना | प्रा.डॉ. वैशाली शेषराव पेरके | 111 |
| 38 | महात्मा गांधीचे 'अभंग विचार' | प्रा. प्रकाश रेशमाजी वाणी | 114 |
| 39 | मोहन ते महात्मा : व्यक्तिमत्त्व विकास व चारित्र्य निर्मिती | धामनगावकर शारदा किशन | 116 |
| 40 | महात्मा गांधी यांचे स्त्रीयाविषयी विचार | प्रा. अनिल जाधव | 119 |
| 41 | महात्मा गांधीजी यांच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा.श्री. विनोद बैरागी | 121 |
| 42 | 'चले जाव' आंदोलनातील म. गांधीजींची भूमिका आणि वास्तव | कु. संचिता चंद्रकांत मोढवे | 123 |
| 43 | कौशल्य विकासाचे जनक : महात्मा गांधी | प्रा.सचिन चंद्रशेखर कंदले | 125 |
| 44 | महात्मा गांधी - व्यक्ति आणिचरित्र निर्माणातील अग्रणी | प्रा. दीपक अंबादास देशमुख | 128 |
| 45 | भारताच्या सर्वसाधारण भाषांवर महात्मा गांधी यांचा दृष्टिक्षेप | डॉ. सुर्यवंशी रामहरी मधुकर | 131 |




Scanned with OKEN Scanner

# ग्रामस्वराज्याविषयी महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान व कार्य

**प्रा. ईश्वर ल. राठोड**

• समाजशास्त्र विभागप्रमुख, शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :-**

मोहनदास करमचंद गांधी भारताच्या स्वातंत्र्य लढयातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. महात्मा गांधी या नावाने ते ओळखले जातात. अहिंसात्मक मार्गानी चळवळी व आंदोलने गांधीजींनी भारतामध्ये निर्माण केले व स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. महात्मा गांधीजींनी समग्र समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक ठिकाणी स्वतः व त्याच्या बरोबर अनेक कार्यकर्ते घेवून लढा उभारला. तसेच चळवळीच्या माध्यमातून समाजाला एकसंघ करुन परिवर्तन घडवून आणले. गांधीजींनी खऱ्या अर्थाने तळागाळातील, खेडे, वाडी, वस्तीवरील लोकांना संघटीत करुन विकासाच्या तथा त्याच्या विचार परिवर्तनासाठी स्वतः लढले. महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्याच्या परिवर्तनासाठी, विकासासाठी, समग्र समाज व्यवस्थेतील विषमतेविरुध्द लढा उभारुन शोषित समाजाला शोषणापासून मुक्त करण्यासाठी यशस्वीपणे ब्रिटिशांशी लढले. महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान हे संपूर्ण भारतीय समाजाला स्वातंत्र्यपूर्व काळात, स्वातंत्र्योत्तर काळात आणि आजच्या २१ व्या शतकात देखील महत्वाचे आहे, असेच म्हणावे लागेल. आजच्या समकालीन भारतात महात्मा गांधीजींची १५० वी जयंती संपूर्ण भारतभर तसेच देश-विदेशात देखील साजरा केली जात आहे. म्हणजे गांधीजींचे विचार आणि तत्वज्ञान हे आजच्या समाजाला किती महत्वाचे आहेत हे यावरुन लक्षात येते.

महात्मा गांधीजींना ग्रामस्वराज्याचे जनकच म्हणावे लागेल. कारण की, महात्मा गांधीनी ग्राम स्वराज्याविषयी महत्वपूर्ण विचार मांडलेले दिसून येतात. त्यांनी ग्रामीण समाजाला केंद्रस्थानी मानून आपले विचार प्रदर्शित केले होते. खरा भारत खेडयामध्येच वसलेला आहे व ती खेडी स्वयंपूर्ण व समृध्द बनली पाहिजेत अशा प्रकारचे विचार महात्मा गांधीजींनी मांडले. यावरुन हे स्पष्ट होते की, गांधीजींचे कार्य हे देशासाठी तर होतेच, परंतु देशाचा पोशिंदा हा शेतकरी आहे. शेतकरी हा खेडयात राहत असून खेडयातील सर्व समस्यांचे निर्मूलन झाले तर ग्राम समृध्द होईल. म्हणून गांधीजींनी खेडयाकडे परत चला असा संदेश देवून ग्राम स्वराज्याच्या परिवर्तनाचे विचार भारतीय जनमानसात पेरले.

**अभ्यास विषयाचे महत्व :-**

प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधीच्या ग्राम स्वराज्याची संकल्पना तसेच गांधीजींचे तत्वज्ञान व ग्राम सुधारणेसाठी केलेल्या कार्यांचा अभ्यास करण्याचे प्रयत्न केले जाणार आहे. महात्मा गांधी यांनी आपल्या आयुष्यातील जास्त वेळ हे ग्राम सुधारणेसाठी दिले आहेत. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर भारतात देखील खेडयामध्ये सर्वाधिक समस्या होती. म्हणून गांधीजींनी खेडयाच्या परिवर्तनाचे व विकासाचे स्वप्न उराशी बाळगून खेडयासाठी भरीव असे कार्य केले. कारण की, गांधीजी सर्व भारतीयांना संदेश देत असताना असे म्हणतात की, 'खेडयाकडे चला', याचा अर्थ असा आहे की, ग्रामीण समाज आजही अनेक समस्यांने ग्रस्त असलेले दिसून येते. भारतीय खेडयाच्या विकासासाठी सर्वांनी परत खेडयाकडे जाणे फार गरजेचे आहे, असे म. गांधीजींना वाटत होते. म्हणून या अभ्यासाच्या माध्यमातून गांधीजींचे ग्राम स्वराज्याची तत्वप्रणाली, कार्य यांचा अभ्यास होणे, महत्वाचे आहे. यावर भाष्य करण्याचे प्रयत्न केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. म. गांधीजींची ग्रामस्वराज्यांची संकल्पना समजून घेणे.
२. म. गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेचा खेडयाच्या विकासातील योगदान अभ्यासणे.
३. म. गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची कार्यप्रणाली आणि ग्रामीण खेडयाचे स्वरुप समजून घेणे.

**संशोधन पध्दती :-**

शोधनिबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2456-9658

GLOBAL RESEARCHER VIEW
An International Peer Reviewed Journal of Social Sciences and Humanities

करतो आणि निष्कर्षाप्रत पोहचतो. त्याचप्रमाणे शोध निबंधात देखील एखादी समस्या निश्चित करुन त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. कोणत्याही शोध निबंधासाठी तथ्य फार महत्वाचे असतात. तथ्य संकलन हे दोन पध्दतीने केले जात असून प्राथमिक आणि दुय्यम हे तथ्यांचे प्रकार आहेत. या शोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा वार केलेला आहे. त्याच प्रमाणे प्रस्तूत शोध निबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आलेला आहे.

**ग्रामस्वराज्याची संकल्पना व महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान :-**

महात्मा गांधींनी 'खेडयाकडे चला' असे बोधवाक्य वापरले तेव्हा त्याचा खरा अर्थ अनेकांना कळलाच नाही. गांधी कालबाहय व संदर्भहीन आहेत, असे म्हणणाऱ्यांचा एक सुविद्य, विद्वानांचा वर्ग निर्माण झाला, म्हणूनच आचार्य कृपलानी यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, 'बुध्द, महावीर, येशू ख्रिस्त हेही कालबाहय झालेत का? कारण जे पाश्चिमात्य नाही, ते आधुनिक नाही असे आपण मानतो. या संदर्भात प्रसिध्द दार्शनिक बन्ट्रार्ड रसेल यांनी भारताबद्दल जे विचार मांडले आहेत. त्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज वाटते. ते म्हणतात, 'India is traditionally a land of village communities. It would be a tragedy if this traditional way of lige, were to be suddenly and violently exchanged for greater evils of industrialization and urbanization.' एवढे तरी कळायला हरकत नसावी. कारण हे मत एका पाश्चिमात्य तत्ववेत्याने प्रदर्शित केलेले आहे, ते केवळ महात्मा गांधीचे मत नाही. त्यामुळे हे स्पष्ट आहे की 'शहराकडून खेडयाकडे परत चला' किंवा 'शहराकडे जाऊ नका' असे म्हणण्याखेरीज अन्य पर्याय नाही. संस्कृती दोनच प्रकारची असते, एक त्यागावर आधारित तर दुसरी लोभ, अगर लालसा यावर आधारित. आज दुदैवाने आपला दुष्ट ग्रह 'मंगळ' नसून, 'चंगळ' हा आहे व चंगळवादाकडेच आपली पावले पडत आहेत. असे आजच्या समाज व्यवस्थेकडे पाहिल्यास लक्षात येते.

**महात्मा गांधीजींच्या ग्राम विकासाचे केंद्रबिंदु**

महात्मा गांधीजींच्या ग्राम विकासाचे केंद्रबिंदु म्हणजे भारतीय ग्रामीण खेडयांचा विकासाचे ध्येय साध्य करणे असे होते. महात्मा गांधीच्या ग्राम विकासामध्ये खेडयातील शेवटचा घटक हा स्वयंपूर्ण आणि सशक्त व्हावा हा त्यांचा उद्देश होता. याचाच एक भाग म्हणून गांधीजींनी स्वच्छतेचा मुलमंत्र दिला आणि भंग्याची कामे स्वतः केली कारण खेडे ही घाणीचे माहेरघर आहे आणि घाणच रोगांना आमंत्रण देते. म्हणून महात्मा गांधीनी गाव स्वच्छतेला आणि रोगांसबंधींच्या लोकांच्या डोक्यातील अंधश्रध्दा नष्ट करण्यावर विशेष भर दिला. एवढेच कार्य गांधीजींनी केले असे नाही, तर समग्र समाजाला लागलेली किड देखील पुसून काढण्याचे कार्य गांधीजींनी केले. समाजातील सर्व विषमतेविरुध्द लढणारा नेता म्हणून देखील त्यांनी कार्य केले. भारताची ओळख ही कृषिप्रधान राष्ट्र अशी असताना भारतातील लोक ग्रामीण अथवा खेडयामध्ये ७० टक्के पेक्षा जास्त राहत होते. परंतु आज आधुनिकीकरणाच्या प्रवाहात यात बदल झालेला दिसून येतो. तरी देखील या देशाचा खरा पोशिंदा हा शेतकरी राजाच आहे. म्हणून खेडे समृध्द असेल तर तो राष्ट्र निश्चितच विकसित राष्ट्र होऊ शकतो.

म. गांधीजींच्या मते, खेडयांचा विकास हाच भारताचा विकास आहे, असा गांधीजींचा ठाम विश्वास होता. म्हणूनच १९२० मध्ये खेडयांकडे चला असा संदेश गांधीजींनी दिला. यामुळे साऱ्या देशाचे लक्ष खेडयांकडे गेले. त्यामुळे ग्रामजीवन, ग्रामसंस्कृती प्रकाशात आली. ग्राम हाच भारताचा कणा आहे हे लोकांच्या लक्षात आले. यातुनच ग्रामीण जनतेचा विकास हे सरकारचे उद्दिष्ट झाले. ग्रामस्वराज्याची संकल्पना प्रामुख्याने आर्थिकदृष्टया स्वयंपुर्ण खेडयावर आधारित होती. अत्यंत साधे राहणीमान आणि भारतीय संस्कृतीचे जतन करणारी माणसे अशा खेडयातून असावीत असे गांधींना वाटत असे. महात्मा गांधीजींनी ग्राम विकासाचे महत्वपूर्ण मार्ग सांगितले आहेत. आदर्श ग्रामस्वराज्याची, आदर्श खेडयाची व ग्राम विकासाचे मार्ग पुढील प्रमाणे गांधीजींना अभिप्रेत होती.

१. प्रत्येक खेडयात सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छ रस्ते असावेत.
२. प्रामुख्याने खादी आणि ग्रामउद्योगाला खेडयामध्ये चालना देणे.
३. खेडयामध्ये कामगारांनी खेडयांतच लघू उद्योगात सहभागी होणे.
४. खेडयांची रचना व्यवस्थाबध्द असावी.



Scanned with OKEN Scanner

५. प्रत्येक खेडे आर्थिकदृष्टया स्वयंपुर्ण असावे.
६. खेडयांच्या प्रगतीतील अडसर म्हणजे औघोगिकरणाची प्रक्रिया.
७. प्रत्येक खेडे अन्न व वस्त्राबाबत स्वयंपूर्ण असावे.
८. प्रत्येक खेडयात धर्मशाळा, नाटयगृहे, दवाखाना, स्वच्छ पाणी आणि समाज मंदिर असावे.
९. लघू उद्योगाला प्रोत्साहन देवून त्यात वाढ घडवून आणणे.
१०. आर्थिक प्रगती आणि ग्रामीण विकासाचे ध्येय साध्य करणे.
११. शिक्षणाला खेडया-पाडयात प्रोत्साहन देणे.
१२. घरेलू उघोग आणि स्वदेशीचा स्विकार करुन परिवर्तन घडवून आणणे.
१३. प्रत्येक खेडयातील कृषिव्यवसाय प्रगत असावा.
१४. खेडयातील जाती व्यवस्था नष्ट व्हावी.
१५. खेडयातील सर्व व्यवहार सहकारी तत्वानुसार चालविले जावेत.
१६. खेडयांचा कारभार ग्रामपंचायती मार्फत चालविला जावेत.
१७. खेडयातील उत्पादन व विक्री स्थानिक बाजार पेठेतच उपलब्ध व्हावी.

**ग्रामस्वराज्याचे कार्य :-**

चंद्रशेखर धर्माधिकारी असे म्हणतात की, महात्मा गांधींनी या देशाची जी अर्थरचना अगर सामाजिक रचना डोळयासमोर ठेवली होती, ती उतरंडी सारखी नव्हती, तर पाण्यातील तरंगासारखी होती. खेडे हे भारताचा चक्रबिंदू आहे असे ते मानीत आणि खेडयापासून सुरु होणाऱ्या लहान तरंगातून किंवा वलयातून मोठ-मोठी वलये निर्माण होतील. हा त्यांच्या अर्थव्यवस्थेचा व अर्थनीतीचा पाया होता. पंचायत राज्याचीही तीच भूमिका आहे. जनतेत स्वराज्यशक्ती निर्माण करण्याचे ते साधन आहे असे ते मानीत असतं.

भारत या देशाला ग्रामस्वराज्य बरोबरच समजावादाची गरज आहे. कारण महात्मा गांधीनी शोषणविरहित समाजाची संकल्पना मांडली होती. समाजवादाचा आधार आर्थिक समानता हाच आहे. समाजवादामध्ये विषमतेला महत्व दिले नाही. सर्व प्रकारचे शोषण आणि गुलामीपासून मुक्ती यालाच समाजवाद म्हणता येईल, गांधीजींनी त्यांच्या समाजवादाचा अर्थ 'सर्वोदय' या संकल्पनेने विषद केला. गांधीजींनी शेती व खादी, ग्रामोघोग मूलक ग्रामस्वराज्य कार्यावर विशेष भर देवून ग्रामीण समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी समाजाला संघटित केले.

गांधीजींच्या तत्वज्ञानाचा व कार्यांचा आधार घेवून खेडयाच्या परिवर्तनामध्ये कुशल कार्य करणारे पोपटराव पवार असे म्हणतात की, खेडी उद्ध्वस्त झाल्याने खेडयात पोट भरता येत नाही. म्हणून तमाम खेडयातल्या लोकांचे लोंढे शहराकडे स्थलांतर करीत आहेत. त्यामुळे उंच-उंच इमारती बरोबरच शहरात मोठया प्रमाणात झोपडपट्ट्या वाढल्या आहेत. परिणामतः अनेक नवनवीन समस्या निर्माण होत आहेत. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, खेडयांचे अस्तित्व व खुशालीवरच शहरांचे सुख स्वास्थ अवलंबून आहे. म्हणून प्रथम खेडी आदर्श व स्वावलंबी झाली पाहिजेत.

गांधीजींच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेचा व तत्वज्ञानाचा अभ्यास केल्यास असे म्हणता येईल की, आजच्या २१ व्या शतकात देखील ग्राम विकासाची गरज असलेले दिसून येते.

**निष्कर्ष :-**

गांधीजींनी खेडयांच्या विकासाकरीता प्रयत्न केले. परंतु त्यावेळी पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून पुन्हा या देशाला गांधीजींच्या ग्रामविकासाच्या तत्वप्रणालीची व कार्याची गरज असलेले दिसून येते. २१ व्या शतकात भारत हा देश महासत्ता होऊ शकला असता, परंतु देशातील दुष्काळ, आर्थिक विषमता, ग्रामीण समाजातील समस्या असे अनेक आव्हाने आजही आहेत. म्हणून गांधीजींच्या विचाराला घेवून समाजामध्ये तसेच खेडयांच्या विकासासाठी परिवर्तनवादी चळवळ अस्तित्वात येणे गरजेचे वाटते.

१. खेडयांच्या प्रगतीशिवाय राष्ट्राची प्रगती अपूर्ण आहे. हे म. गांधीचे मत आजही वास्तव आहे.
२. गांधी विचारधारेचा ग्रामस्वराज्य आणि ग्रामीण पुनर्रचना कार्यक्रम राबविण्याची आजही नितात गरज आहे.
३. गांधीजींना अपेक्षित असलेल्या ग्राम विकासाकरिता जनतेने आपली भूमिका अधिक जबाबदारीने पार पाडणे आवश्यक आहे.
४. शाश्वत विकासासाठी गांधीजीचे विचार आधुनिक समाजाने समजून घेणे आवश्यक आहे.
पंचायतराज व्यवस्था तसेच ग्रामीण विकासाशी संबधित असलेल्या योजना, आयोग, अभियान व



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2456-9658

GLOBAL RESEARCHER VIEW
An International Peer Reviewed Journal of Social Sciences and Humanities

इतर उपक्रमाच्या माध्यमातून खेडयात बदल होत आहे.

## संदर्भ

१. पाटील वा. भा. (१९९८), भारतीय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर
२. भिडे पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. सुराना पन्नालाल, (२००४), गांधीजींची ओळख, सुगावा प्रकाशन, पुणे.
४. सं. वाडेकर अमित, (२०१२), खेडयाकडे परत चला, वनराई विशेषांक, पुणे.
५. कठारे अनिल, महाराष्ट्रातील समाजसुधारक, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
६. संपादक- हंसा, (२००१), लौट आइए बापू, न्यु बूक सोसायटी ऑफ इंडिया, दिल्ली.
७. यार्दी अ. रा. (२०१३), बाळ गांधी, गांधीबापू झाले, त्याची गोष्ट, साहित्य अकादमी, दिल्ली.
८. शुक्ल चंद्रशेखर, (१९५०), गांधीजी के जीवन प्रसंग, दिल्ली प्रकाशन.
९. Search – Google engine.



Scanned with OKEN Scanner